# समिती दर्पण

सप्टेंबर-ऑक्टोबर २०२१

विद्यार्थी साहाय्यक समिती
दूरध्वनी - ०२० -२५५३३६३१, मोबाइल - ९४०४८५५५३०
ईमेल - info@samiti.org, वेबसाइट - www.samiti.org

## समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पाहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्चशिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरवात झाली. पुढे त्यांच्या निवासाचा प्रश्न मार्गी लावला. मग विद्यार्थिनींसाठी सोय करण्यात आली. आज समितीची पुण्यात पाच वसतिगृहे आहे. त्यात ७५० विद्यार्थी- विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम समितीमार्फत राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.



# समितीच्या लेकींचा रंगला स्नेहमेळावा

रविवारची प्रसन्न सकाळ... सुमारे दीड वर्षांने विद्यार्थी साहाय्यक समितीच्या अच्युतराव आपटे वसतिगृहाचे आवार नऊ वाजल्यापासूनच गजबजू लागले होते. दरवाजात स्वागतासाठी काढलेली रांगोळी, फुलांची सजावट आणि माहेरवाशिणीच्या ओढीने येणाऱ्या प्रत्येकीचे हसतमुखाने स्वागत करणाऱ्या स्वयंसेविका... निमित्त होते माजी विद्यार्थिनी मेळाव्याचे. ३ ऑक्टोबर २०२१ रोजी हा मेळावा पुण्यात अ. शं. आपटे वसतिगृहातील नूतनीकरण केलेल्या सभागृहात झाला.

सन २०१६ पासून दरवर्षी समितीच्या माजी विद्यार्थिनींचा मेळावा आयोजित केला जातो. गेल्यावर्षी कोरोनामुळे ऑनलाइन मेळावा झाला, त्यामुळे प्रत्यक्ष एकमेकींना भेटता आले नाही. त्यामुळे यंदा मैत्रिणींना भेटण्याची ओढ जरा जास्त होती.

मेळाव्यासाठी पुण्याबरोबरच बारामती, नारायणगाव, भोसरी, पेठ (आंबेगाव), मोशी, तळेगाव दाभाडे, नाशिक, कोल्हापूर, पारनेर, वाई, माथेरान, घाटणे (मोहोळ, सोलापूर), डोंबिवली आदी ठिकाणांहून विद्यार्थिनी आल्या होत्या. समितीच्या मुशीत घडलेल्या यातील प्रत्येकीने आपापल्या क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला होता. यातील काही जणी वैद्यकीय क्षेत्रात सेवा करणाऱ्या होत्या, काही वाणिज्य क्षेत्रात कार्यरत होत्या, उद्योजिका होत्या, काही जणी अध्यापनाचा वसा घेत नवी पिढी घडविण्याचे काम करणाऱ्या होत्या. काही नोकरी- व्यवसायातून निवृत्त होऊन पूर्णवेळ गृहमंत्रीपद सांभाळत होत्या.

### माहेरी आल्याचा आनंद

१९७६ पासून २०१९ पर्यंत वेगवेगळ्या कालावधीत समितीच्या वसतिगृहात राहिलेल्या या वेगवेगळ्या वयोगटातील या विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर माहेरी आल्याचा आणि आपल्या जिवलग आप्तजनांना भेटल्याचा आनंद ओसंडून वाहत होता. शिस्त, स्वावलंबन आणि श्रमसंस्कार याबरोबरच येथील वास्तव्यात मिळालेला आत्मविश्वास ही शिदोरी जगण्याच्या वाटचालीत पावलोपावली उपयोगाला आली आणि त्यामुळेच समितीत येण्याची ओढ आजही कायम आहे, असेही अनेकींनी नमूद केले.

### नवीन वसतिगृहासाठी मदतीचा संकल्प

ग्रामीण भागातील अनेक मुलींचे शहरात येऊन उच्चशिक्षण घेण्याचे स्वप्न केवळ राहण्याची सुरक्षित व्यवस्था नाही, या कारणामुळे पूर्ण होऊ शकत नाही. त्यापैकी काही जणींचे स्वप्न तरी साकार व्हावे, यासाठी विद्यार्थी साहाय्यक समितीने हाती घेतलेल्या नव्या वसतिगृहाच्या प्रकल्पातील एका विंगच्या उभारणीसाठी संपूर्ण हातभार लावण्याचा संकल्प या मेळाव्याच्या निमित्ताने माजी विद्यार्थिनींनी केला.

## मुलींसाठी नवे वसतिगृह



ग्रामीण भागातून शहरी भागात शिक्षणासाठी येणाऱ्या मुलींचे प्रमाण पूर्वी कमी होते. विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहातही मुलींची संख्या कमी होती. आता ग्रामीण मुलीही वेगवेगळ्या क्षेत्रात पुढे येत आहेत. गावात शिक्षणाच्या पुरेशा सुविधा नसल्याने त्या शहरात येऊन शिकण्याचा प्रयत्न करत आहेत. मुलींना शहरात पाठवायचे, तर सुरक्षित आणि विश्वासार्ह ठिकाण हवे, अशी पालकांची धारणा असते. त्यातून विद्यार्थी साहाय्यक समितीत प्रवेश मिळाला, तरच पुण्यात शिकायला पाठवणार, अशी भूमिकाही अनेक पालक घेत असल्याचे समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. मात्र सध्याच्या स्थितीत समितीत ३२५ मुलींची सोय करता येते. त्यामुळे समितीत राहण्यासाठी इच्छुक असलेल्या ५ गरीब आणि गरजू विद्यार्थिनींपैकी फक्त एकीला प्रवेश देणे सध्या शक्य होते. हे लक्षात घेऊन, आणखी मुलींची व्यवस्था करून, त्यांना शैक्षणिक क्षेत्रात भरारी घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी समितीने नवीन वसतिगृह बांधण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे.

या नवीन वसतिगृहात आणखी २५० मुलींची राहण्याची सोय होणार आहे. सध्याच्या मुलांच्या लजपत वसतिगृहाच्या परिसरातील मोकळ्या जागेत देणगीदारांच्या मदतीने उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पाचा आराखडा तयार असून येत्या तीन महिन्यांत त्याच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल. या वसतिगृहाचे वैशिष्ट्य म्हणजे यात सर्व अत्याधुनिक सोयीसुविधा असतील. प्रत्येक खोलीसाठी टॉयलेट, बाथरुमची स्वतंत्र व्यवस्था असेल.

एकूण २० कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पाचे शिवधनुष्य समितीने उचलले आहे. ते पेलण्यासाठी अर्थातच समाजातील दानशूरांच्या मदतीची गरज आहे. यातील एका मजल्यासाठी २.५ कोटी रुपये, तर एक खोलीसाठी १० लाख रुपये खर्च येणार आहे.

## आठवणींचे पान...

### देणगी... मागून घेतलेली आणि नाकारलेली!

रत्नाकर मते

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पुणे शहरात येऊन उच्चशिक्षण घेता यावे, या उद्देशाने डॉ. अच्युतराव आपटे यांनी सन १९५५ मध्ये विद्यार्थी साहाय्यक समितीची स्थापना केली. शिक्षणाला संस्कारांची जोड दिली तरच खरा समाज घडेल अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे ही संस्था समाजाच्या मदतीवरच उभी राहावी, सरकारी अनुदान न घेता समाजातील दानशुरांनी दिलेल्या देणग्यांमधून संस्था चालवावी, असा त्यांचा दंडक होता. मात्र देणग्या स्वीकारतानाही त्यांनी ग्रामीण भागातील सर्वसामान्य, गरजू विद्यार्थ्यांचे हित जपले जाईल, याची काळजी घेतली. त्यामुळे काही जणांकडून त्यांनी हक्काने देणगी घेतली तर एखाद्या अपेक्षेने दिलेली देणगी साभार परतही केली.

त्या संदर्भातील एक किस्सा पुणे महापालिकेचे माजी सहायक आयुक्त, समितीचे हितचिंतक ल. नी. किंकर यांनी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या हिरक महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात सांगितला होता. समितीसाठी देणगी मागण्याकरता कार्यकर्ते सेनापती बापट यांच्याकडे गेले होते. त्यावेळी मी काय देणगी देणार, त्या कोटाच्या खिशात काही पैसे असतील तर घ्या, असे सेनापती बापट यांनी सांगितले. त्यांच्या कोटाच्या खिशात पाच रुपये होते.

ती पाच रुपयांची देणगी सोनेरी अनुभवासारखी होती. त्याच दरम्यान एका व्यक्तीने मोठी देणगी देऊ केली, मात्र त्याचवेळी विशिष्ट समाजातील मुलांना समितीत प्राधान्याने प्रवेश द्यावा, अशी अट घातली. ती देणगी मात्र साभार परत केल्याची आठवण किंकर यांनी सांगितली.

# ...आणि लॉकडाऊनही झाले सुसह्य

कोरोनाच्या काळात लॉकडाऊनमुळे शाळा, महाविद्यालये बंद झाली. पुण्यात शिक्षणासाठी राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी गावाकडची वाट धरली. विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहातील मुलेही आपापल्या गावी घरी परतली. लॉकडाऊनमुळे सर्वांच्याच दैनंदिन जीवनात उलथापालथ झाली. वर्क फ्रॉम होम, ऑनलाइन शिक्षण यामुळे अनेकांच्या आरोग्यावर परिणाम झाला, मानसिक तणावालाही सामोरे जावे लागले. मात्र श्रमसंस्कार, सकारात्मकता, शिस्त यामुळे समितीतील विद्यार्थ्यांना हा लॉकडाऊनही सुसह्य झाला. त्यांचे हे अनुभव त्यांच्याच शब्दांत...

### योगा, स्वावलंबन, स्वच्छतेचा कुटुंबालाही फायदा



योगा, स्वच्छता आणि स्वावलंबन या विद्यार्थी साहाय्यक समितीच्या त्रिसूत्रीशी आपण परिचित आहोत. कोरोनाच्या काळात योगा आणि चिंतनाचा मला आणि माझ्या परिवारातल्या सदस्यांना खूप फायदा झाला. कारण माझ्याबरोबर त्यांच्याकडूनही मी योगा करून घेत होते. समिती परिवारात राहिल्यामुळे मला स्वावलंबन काय असते, हे समजले. त्यामुळे माझी घरातून पैसे मागायची सवय मोडली. मी काजू प्रोसेसिंग हा छोटासा उद्योग चालू केला आहे. खऱ्या अर्थाने स्वावलंबनाचा मला फायदा झाला. स्वच्छतेची तर आता सवयच होऊन गेली आहे आणि आम्हाला पुढे ती खूप उपयुक्त ठरेल.

– दीप्ती उदय कावळे

### स्वावलंबनाचा मार्ग सापडला



Gratitude makes sense of your past,
brings peace for today,
and creates a vision for tomorrow.
- Melody Beattie

वरील thought वाचला आणि समितीविषयी gratitude express करण्यासाठी खालील काही शब्द...

योगा- समितीमध्ये लागलेली सकाळी योगा करण्याची सवय ही सध्याच्या online lecture, exam pressure, health related issues , covid, यामुळे निर्माण झालेला stress या सर्वांमधून relief मिळण्यासाठी खूपच उपयुक्त ठरत आहे. योगाची सवय समितीमध्ये लागली व ती अजूनही कायम आहे, याचा आनंद देखील आहे.

स्वच्छता- समितीने राबविलेला एक उपक्रम म्हणजे वृक्षारोपण. त्यावेळी घरी काही झाडे लावली आहेत, मग झाडांचा पालापाचोळा साफ करणे, त्याचा खतासाठी वापर करणे, यात संध्याकाळचा वेळ अगदी छान जातो आहे. स्वावलंबन- कोरोनाच्या काळात स्वावलंबनाची गरजही बऱ्याच प्रमाणात समजली. यासाठी प्रयत्न तर सुरू होतेच आणि आहेत. पण यात समितीद्वारे मिळालेली संधी म्हणजे आत्मजा फाउंडेशनशी जोडले गेले आणि एक खूप चांगला मार्ग मिळाला स्वावलंबनाकडे जाण्याचा.

– अस्मिता शिंदे

## यशवंत- गुणवंत



### सतीश मोहन आघाव

**समितीतील वास्तव्य २०१६- २०१९**
**(बी. कॉम. करत असताना)**
**सनदी लेखापाल (सी.ए.)**
परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण.

मूळचा मु. पो. होतोला, ता. आष्टी, जि. बीड गावचा असलेल्या सतीशचे आईवडील शेती करतात. कुटुंबात कोणीही उच्चशिक्षित नसताना स्वतःची जिद्द आणि मेहनतीच्या बळावर सतीशने हे यश मिळविले.



### लाभेश संजय रणसिंग

**समितीतील वास्तव्य २०१४- २०१६**
**(बी. कॉम. करत असताना)**
**सनदी लेखापाल (सी.ए.)**
परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण.

लाभेश मूळचा मु. पो. वडगाव तांदळी, ता. जि. अहमदनगर या गावचा. शेती हेच त्याच्या कुटुंबाचे उदरनिर्वाहाचे साधन. घरात कोणतीही शैक्षणिक पार्श्वभूमी नसताना स्वतःच्या हिमतीवर लाभेशने हे यश मिळविले.



शिंपल्यातील मोती

सन २०१० ते २०१५ या काळात समितीत वास्तव्य करून अकरावीपासून ते इंजिनिअरिंग पदवीपर्यंत शिक्षण घेतलेली पूजा भाऊसाहेब पानसरे ही महाराष्ट्र वनसेवा परीक्षा (२०१९) राज्यात महिलांमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. सहायक वनसंरक्षक वर्ग १ या पदावर तिची नुकतीच निवड झाली आहे. आपल्या या यशात समितीतील शिस्त आणि संस्काराचा मोठा वाटा असल्याचे ती अभिमानाने सांगते...

# समितीतील शिस्त, संस्कारांमुळे व्यक्तिमत्त्व विकास

सन २०१० मध्ये समितीमध्ये प्रवेश केला. सुरुवातीला ४ तास काम, कमवा- शिका, विद्यार्थी विकास केंद्राचे कार्यक्रम म्हणजे कटकट वाटायची. पण माझ्या सर्वांगिण व्यक्तिमत्त्व विकासासाठी या सगळ्याचे खूप मोठे योगदान आहे.

मी आजही रोज सकाळी उठून योगा करते. स्पर्धापरीक्षांच्या अभ्यासाच्या काळात योगा आणि मेडिटेशनमुळे दिवसभरात १४- १५ तास बसून अभ्यास करण्याचा स्टॅमिना निर्माण झाला.

चार तास कामामुळे स्वतःची सगळी कामे स्वतः करायची सवय लागली. त्याचप्रमाणे सगळी कामे करून अभ्यास करण्यासाठी वेळेच्या नियोजनाची सवय अंगवळणी पडली.

माझ्या व्यक्तिमत्त्व विकासात विद्यार्थी विकास केंद्राच्या कार्यक्रमाचा खूप मोठा वाटा आहे. आत्मविश्वास (सेल्फ कॉन्फिडन्स), स्टेज डेअरिंग, कोणतीही गोष्ट नेमक्या शब्दांत मांडणे, हजरजबाबीपणा या सगळ्या स्पर्धापरीक्षांच्या मुलाखतीवेळी आवश्यक असणाऱ्या गोष्टी नकळत माझ्यामध्ये आल्या त्या समितीमुळेच.

समितीमध्ये सगळ्यांमध्ये मिळून मिसळून राहायची सवय लागली. फक्त स्वतःपुरता विचार न करता, सगळ्यांचा विचार करायला शिकले. योगाप्रमुख, होस्टेल प्रमुख म्हणून काम केल्याने नेतृत्व गुणांचा विकास होत गेला. सगळ्यांना एकत्र घेऊन काम करायला शिकले.

अजून एक महत्त्वाचा उल्लेख करावासा वाटतो, ते माझे पालक मेंहदळेसर यांचा. सरांनी आणि मॅडमनी मला नेहमी आपलेपणाची वागणूक दिली. माझ्या आताच्या वनसेवेच्या निकालानंतर त्यांना फोन केला असता त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांनी माझे कौतुक केले. समितीच्या रेक्टर गारवेताई, विद्याताई, तेव्हा विद्यार्थी विकास केंद्रात असणारे पाटीलसर, निर्मलाताई पुरंदरे, डॉ. आंबेकरसर व समिती परिवारातील सदस्यांनी वेळोवेळी सर्व मदत केली. मी समितीची नेहमीच ऋणी राहिन आणि पुढील काळात माझ्याकडून शक्य तेवढी सर्व मदत सध्या समितीमध्ये असणाऱ्या माझ्या लहान मित्रमैत्रिणींना करेन.

**पूजा भाऊसाहेब पानसरे**



## समिति वृत्त

### महामारीत अन्नसेवेतून जागविली समाजाप्रती संवेदना

गेल्यावर्षी लॉकडाऊनचा मोठा फटका अनेकांना विशेषतः श्रमजिवींना बसला. हातावरचे पोट असणाऱ्यांच्या कुटुंबांची अक्षरशः उपासमार सुरू झाली. अशावेळी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत अक्षयपात्र संस्थेच्या माध्यमातून गरजूंसाठी अन्नसेवा सुरू केली. समितीचे ६०० हून अधिक माजी विद्यार्थी, कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी त्यासाठी निधी उभारला. गेल्या वर्षी म्हणजे सन २०२० मध्ये ३० मार्च ते ७ जून या काळात सिंहगड रस्ता, औंध, कोंढवा, थेरगाव, बुधवार पेठ या भागात रोज दोन वेळचे जेवण पुरविले. सुमारे सव्वालाख बेघर, देवदासी, गरीब, गरजूंना या उपक्रमाचा लाभ मिळाला.




**दुसऱ्या लाटेत आरोग्य सेवकांसाठी अन्नसेवा**

कोरोनाची दुसरी लाट पहिल्या लाटेपेक्षा तीव्र होती. दुसऱ्या लाटेने अनेकांचे जिवलग हिरावून नेले. या लाटेत आरोग्य यंत्रणा अपुरी पडत होती. वाढत्या रुग्णसंख्येमुळे डॉक्टर, परिचारिका आणि सर्वच आरोग्य कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण आला होता. अनेक ठिकाणी त्यांची जेवणाची आबाळ होत होती. विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत दररोज आरोग्यसेवक तसेच रुग्णांच्या काळजीने रुग्णालयाबाहेर थांबलेले नातेवाईक अशा सुमारे अकराशे जणांना दोन वेळचे जेवण पुरवले.

### मान्यवरांकडून कौतुक

कोरोना महामारीच्या काळात अन्नसेवा देणाऱ्या विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी कौतुक केले. या उपक्रमाची माहिति घेत समितीच्या उपक्रमांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. त्यांच्यासमवेत संगणक तज्ज्ञ आणि समितीचे माजी विश्वस्त डॉ. दीपक शिकारपूर यांनीही समितीला भेट दिली आणि समितीच्या अन्नसेवेच्या कार्याला प्रोत्साहन म्हणून एक दिवसाचा जेवणाचा खर्च दिला.

खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोदकुमार सिंह यांनीही अन्नसेवा उपक्रमाच्या निमित्ताने समितीला भेट दिली. सकारात्मक आणि निःस्वार्थ भावनेने होत असलेले काम पाहून प्रभावित झालो. भविष्यात समितीच्या कार्याशी जोडून घ्यायला आवडेल, असे सांगत त्यांनी समितीच्या कामाचे कौतुक केले.



समिती विचारांची आणि संस्कारांची वसतिगृहे राज्यभर, देशभर उभारण्यासाठी आपण प्रयत्न करू, असे उद्गार काढले राज्याचे शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी यांनी. विद्यार्थी साहाय्यक समितीला भेट देत त्यांनी समितीचे विश्वस्त, कार्यकर्ते, कर्मचाऱ्यांबरोबर अनौपचारिक चर्चा केली. समितीत स्वच्छता आणि श्रमसंस्काराचे जे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजवले जाते, ते अलौकिक आहे. समितीचे काम उत्कृष्ट आहे, पण त्याचा लाभ मर्यादित विद्यार्थ्यांना मिळतो. म्हणूनच या कामाची व्याप्ती वाढविण्याची गरज आहे, असे सोळंकी म्हणाले.

### पर्यावरण संतुलनाबरोबरच साधले विद्यार्थीहित

**समिति आशीर्वाद वृक्ष योजना**

कोरोना काळात लॉकडाऊनमुळे शाळा- महाविद्यालये बंद झाल्यानंतर विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहातील सर्व विद्यार्थी आपापल्या गावी परतले. मात्र त्यापैकी अनेकांच्या घरची परिस्थिती अशी होती की, हातातोंडाची गाठ पडणे अवघड.. अशावेळी कमवा- शिका योजनेतून काही काम मिळेल का, अशी विचारणा विद्यार्थ्यांकडून होऊ लागली आणि त्यातूनच आकाराला आली समिती आशीर्वाद वृक्ष योजना. समाजातील देणगीदारांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी आपल्या गावात वृक्षारोपण करायचे, त्या रोपाला कुंपण घालायचे आणि त्याचे संवर्धन करायचे, अशी ही योजना. या कामासाठी विद्यार्थ्यांना काही मोबदला दिला गेला, जो त्यांना



ऑनलाइन शिक्षण घेत असताना आवश्यक गरजांसाठी उपयोगी ठरला. या उपक्रमांतर्गत पर्यावरण संतुलनाचा विचार करत प्राधान्याने वड, पिंपळ, चिंच अशा देशी वृक्षांची लागवड केली गेली.

## उद्योजकतेसाठी आत्मनिर्भर

### नोकरदार नव्हे, उद्योजक घडविण्याचे स्वप्न



मी समितीमध्ये १९८८-९१ या कालावधीमध्ये राहत असताना कमवा व शिका योजनेमध्ये सामाजिक जाणीव प्रकल्प, पेपर कटिंग, बागकाम, विद्यार्थी विकास केंद्रप्रमुख म्हणून काम केले. त्यावेळी तासाला दोन रुपये मिळत असत. याच कालावधीमध्ये आम्हाला डिटर्जंट पावडर, लिक्विड सोप, फिनेल आदी बनविण्याचे व विकण्याचे काम मिळाले. हाच व्यवसाय आईने पुढे चार वर्ष घरी केला. या व्यवसायामुळे कुटुंबाला मोठा आर्थिक हातभार लागला.

मला फोटोग्राफीची आवड आहे. कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला असताना कोडॅकचा कॅमेराघेतला. समितीतील विद्यार्थ्यांच्या सहलीचे, विविध कार्यक्रमांचे फोटो काढून व्यवसाय केला. याच दरम्यान समितीमध्ये भरलेल्या छायाचित्रांच्या प्रदर्शनामध्ये मला पहिले पारितोषिकमाननीय शरदचंद्र गोखले यांच्या हस्ते मिळाले.

महाविद्यालयाच्या दुसऱ्या वर्षाला असताना समितीमध्ये माझे दोन्ही रूम पार्टनर संगणक शास्त्रातील पदवी घेत असल्याने संगणकाची आवड निर्माण झाली. पुढे संगणक प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर सन १९९३ माझ्या गावात इंदापूरमध्ये अल्फा बाईट ही पहिली संगणक प्रशिक्षण संस्था चालू केली. या संस्थेतून आतापर्यंत ३० हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले आहे. अनेक विद्यार्थी नोकरी, व्यवसाय करत स्वतःच्या पायावर उभे राहिले. समितीमध्ये विद्यार्थी विकास केंद्र, कमवा-शिका इत्यादी योजनांच्या माध्यमातून जी जडणघडण झाली, त्यातूनच पुढे या सर्व गोष्टी उत्तमतेने करता आल्या. सन २००९ पासून जीवनातील ५० टक्के वेळ समितीला देण्याचे ठरविले. विद्यार्थी विकास केंद्राचे काम करत असताना २०१५ मध्ये विद्यार्थ्यांच्या चर्चेतून सायन्स क्लब, कॉमर्स क्लब, उद्योजकता क्लब, स्पोर्टस् क्लब, कल्चरल क्लब, इंजीनियरिंग क्लब अशा विविध क्लबची निर्मिती झाली. यातील उद्योजकता क्लब, सायन्स क्लब, इंजीनियरिंग क्लबमधून मुलांचे स्वयंस्फूर्तीने उत्तम योगदान अनुभवायला मिळाले.

विश्वस्त मंडळाच्या बैठकीमध्ये माननीय अध्यक्ष प्रतापराव पवार सरांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा पुढील वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात वापर होणार आहे, त्यातून अनेकांच्या नोकऱ्या जाणार आहेत, त्यामुळे उद्योजकतेवर भर देण्यास सुचविले. त्यानुसार मी उद्योजकता विकास केंद्राची कल्पना विश्वस्त मंडळात मांडली व प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये उद्योजकीय मानसिकता निर्माण करण्याचा विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रयत्न केला. तसेच दे आसरा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, भाऊ आदी अनेक संस्थांबरोबर करार केले. या कामासाठी स्वतंत्र गट तयार केला. भविष्यात समितीच्या विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या दिशेने आत्मनिर्भर बनवणारी ही नांदी ठरेल, असा विश्वास आहे.

**- तुषार रंजनकर,**
विश्वस्त, विद्यार्थी साहाय्यक समिती

# विद्यार्थ्यांच्या हाताला दाम व अंगभूत कलागुणांना संधी

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सामंजस्य करार

समितीच्या वसतिगृहात राहणारे विद्यार्थी ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातून आलेले असतात. दैनंदिन खर्चासाठी घरून पैसे मिळणे शक्य नसते. त्याकरता समितीतर्फे कमवा- शिका योजना राबविली जाते. ज्यातून विद्यार्थ्यांची कमाई होते आणि त्यांच्यामध्ये श्रमसंस्काराचे महत्त्व रुजते. मात्र या योजनेतून केवळ कमाई हा उद्देश न ठेवता, विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा, त्यांना अनेक नवीन गोष्टी शिकता याव्यात, हाही प्रयत्न असतो. यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि विद्यार्थी साहाय्यक समिती यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या करारानुसार, विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळणार आहे. तसेच त्यांना स्वयंपूर्ण होण्यास मदत होईल, अशा कामांमध्ये सहभागी करून घेण्यात येणार आहे. यामध्ये कागदी पिशव्या, कापडी पिशव्या, खतनिर्मिती, औषधी वनस्पती लागवड, बांबूपासून विविध वस्तू तयार करणारे, विद्यापीठाचे बोधचिन्ह असलेल्या वस्तू तयार करणे, मुद्रणालयातील विविध कामे तसेच प्रशासकीय कामांचा समावेश आहे.



## डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहाचे नूतनीकरण



विद्यार्थी साहाय्यक समितीच्या डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. सुमारे १८३ विद्यार्थिनींच्या निवास-भोजनाची सोय असलेल्या या वसतिगृहात सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यात सर्व सुविधांनी सुसज्ज असे सभागृह, व्हिडीओ कॉन्फरन्सिंग यंत्रणा, अतिथी कक्ष, आधुनिक पद्धतीची प्रसाधनगृहे यांचा समावेश आहे. या नूतनीकरणाचे उद्घाटन १४ ऑगस्ट २०२१ रोजी लोकसभेच्या माजी अध्यक्षा सुमित्रा महाजन यांच्या हस्ते झाले. मला काय त्याचे... यापेक्षा मलाच त्याचे, या भावनेने विद्यार्थी साहाय्यक समितीशी संबंधित सर्व जण काम करतात. ग्रामीण विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी येथे जे उपक्रम राबविले जातात, ते संस्थेचे वेगळेपण आहे. म्हणूनच येथील माजी विद्यार्थ्यांना या संस्थेकडे परत यावेसे वाटते. ही गोष्ट या समितीच्या कामाची पावती आहे. असे गौरवोद्गार श्रीमती सुमित्रा महाजन यांनी या कार्यक्रमात काढले.

**विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास संकल्पना पुस्तकाचे प्रकाशन**

वसतिगृह नूतनीकरण उद्घाटन कार्यक्रमात समितीचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रकाश अकोलकर यांच्या विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास संकल्पना या पुस्तकाचे प्रकाशन कॅप्टन चंद्रशेखर चितळे यांच्या हस्ते झाले. अकोलकर यांनी लिहिलेल्या या पुस्तकातून समितीची घडण लक्षात येते.